आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

सोमवार दिनांक २७ जानेवारी २०२५

ठळक बातम्या

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची राष्ट्रीय छात्र सेनेच्या वार्षिक मेळाव्याला उपस्थिती.
2. देशातील पहिल्या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण.
3. गुलेन बॅरी सिंड्रोम या आजारामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचं पथक पुण्यात दाखल.
4. भारतीय राज्यघटनेच्या ७५ व्या वर्षपूर्तीनिमित्त फेब्रुवारी महिन्यात राज्यातल्या ६ हजारांहून अधिक महाविद्यालयांत "संविधान गौरव महोत्सव' साजरा होणार.
5. नागपूर विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या शतकपूर्ती निमित्त उद्या मुख्यमंत्राच्या उपस्थितीत उद्घाटनिय कार्यक्रम.

---------------------------

युवा शक्ती-विकसित भारत

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज राष्ट्रीय छात्र सेनेच्या वार्षिक मेळाव्याला उपस्थित आहेत. सर्वप्रथम त्यांनी सादर झालेल्या सांस्कृतिक, साहसी कार्यक्रमांचे अवलोकन केले आणि सलामी स्वीकारली. उपस्थितांना संबोधित करताना ते म्हणाले की यंदाची परेड विशेष असून, आपल्या सर्वांच्या देखील हे स्मरणात राहील, की आपण गणतंत्र्याला 75 वर्ष पूर्ण झाल्या निमित्त आयोजित परेडमध्ये सहभागी झालो होतो. ज्यांना उत्कृष्ट कॅडेटचा पुरस्कार मिळाला आहे त्यांचे देखील पंतप्रधानांनी अभिनंदन केले. एनसीसीच्या अनेक अभियानांना त्यांनी झेंडी दाखवली. मागील काही वर्षात एनसीसीची व्यापकता आणि दायित्व दोन्ही वाढवण्याच्या दिशेने सरकारने मोठ्या प्रमाणात प्रयत्न केल्याचं ते म्हणाले. या कार्यक्रमात १८ मित्र देशांतले १४४ कॅडेट्स सहभागी झाले

---------------------------

फॉरेन्सिक व्हॅन

देशातील पहिल्या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन अर्थात फिरत्या न्यायवैद्यक वाहनाचे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. राज्यात

एकूण २५६ फिरते न्यायवैद्यक वाहने तयार करण्यात येत असून त्यातील २१ वाहनांचे आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. केंद्र सरकारने लागू केलेल्या नव्या भारतीय साक्ष कायद्यानुसार एखाद्या गुन्ह्यातील पुराव्यांची न्यायवैद्यक पद्धतीने साक्ष तसेच पुरावे गोळा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निकषांनुसार पुरावे जमा करण्यासाठी न्यायवैद्यक वाहनांचे लोकार्पण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

*(होल्ड बाईट - फडणवीस २२ सेकंद)*

*देशामध्ये केंद्र सरकारने जो नवीन साक्ष कायदा लागू केलेला आहे, या कायद्याने साक्ष जमा करणे, त्या संदर्भातली योग्य प्रकारची व्यवस्था करणे, त्याचे स्टोरेज करणे,याचे नवीन नियम सुरू केलेले आहे. त्या नियमाच्या अंतर्गत महाराष्ट्र पहिले राज्य आहे, ज्या राज्याने त्याला अनुकूल अशा प्रकारच्या मोबाईल फॉरेनसिक व्हॅन तयार केलेले आहे.*

या वाहनांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शास्त्रीय पद्धतीने पुरावे गोळा करणे आणि ते साठविण्याची व्यवस्था करण्यात आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लोकार्पण सोहळ्यानंतर बोलताना स्पष्ट केले. एखादा गुन्हा घडल्यानंतर सर्वप्रथम घटनास्थळी पोहचून वैज्ञानिक पद्धतीने पुरावे गोळा करण्याची यंत्रणा हा वाहनांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे गुन्हे सिद्धीचे प्रमाणात गुणात्मक वाढ होणार आहे. तसेच, सबळ पुरावे नसल्याने किंवा पुराव्यांसोबत छेडछाड झाल्यामुळे गुन्हेगार सुटण्याचे प्रमाणही या वाहनांमुळे कमी होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

---------------------------

फडणवीस-मत्स्य विभाग आढावा

राज्यात गोड्यापण्यातील खंडांतर्गत मासेमारीला मोठा वाव आहे. सध्याच्या खंडाअंतर्गत मासेमरिमध्ये वाढ करण्यासाठी धोरण निश्चित करावे. तसेच मत्स्यबीज मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होण्यासाठी ही धोरण तयार करावे अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. सह्याद्री अतिथीगृह इथं मत्स्य व्यवसाय विभागाच्या १०० दिवसांच्या नियोजनाचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सविस्तर आढावा घेतला त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या. फडणवीस म्हणाले की, खंडातर्गत मत्स्य व्यवसाय वाढवणे गरजेचे आहे. मत्स्यबीज उपलब्धता हे गोड्या पाण्यातील मासेमारीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. मत्स्यबीज उपलब्धता वाढविण्यासाठी धेयात्मक काम करावे. ज्या ठिकाणी राज्यात मत्स्य बीज प्रक्रियेविषयी चांगले काम होत आहे. त्यांना प्रोत्साहन आणि निधी देण्यात यावा.

त्यासोबतच सागरी मासेमारी विषयी सर्वसमावेशक धोरण तयार करावे अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

---------------------------

गुलेन बॅरी सिंड्रोम

गुलेन बॅरी सिंड्रोम या आजारामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचं पथक पुण्यात दाखल झालं आहे. या ७ सदस्यीय पथकात राष्ट्रीय संसर्गजन्य आजार नियंत्रण संस्था, भारतीय वैद्यकीय संशोधन संस्था, तसंच राष्ट्रीय विषाणू संस्थेतल्या तज्ज्ञांचा समावेश आहे. दरम्यान या विषयी सध्याच्या परिस्थिती मध्ये करण्यात येणाऱ्या उपाययोजना आणि सावधगिरी याबाबत आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी माहिती दिली..

*(होल्ड बाईट -प्रकाश अबिटकर -३४ सेकंद)*

*पुणे शहर में जीबीएस सिंड्रोम के पेशेंट्स बढ़ रहे हैं। उसके कारण पुणे में थोड़ी सी चिंता का कारण बढ़ गया है। लेकिन मैं अपील आप के माध्यम से करता हूँ कि ये जो पेशेंट्स हैं उसके बारे में हमारे जो डॉक्टर्स की एक्स्पर्ट टीम है उसका ओपिनियन आज कल आ जाएगा। और पुणे महानगर पालिका और हेल्थ डिपार्टमेंट ऑफ़ महाराष्ट्र दोनों मिलके अच्छी तरह से ये जीबीएस के सिंड्रोम के पेशेंट ना बढ़ पाए इसके लिए अच्छी तरह से काम करेंगे। हम लोग विजिट कर रहे हैं। इसके बाद लोग एक्स्पर्ट के टीम से बात करेंगे और उसके बाद राइट कन्क्लुजन पर फिर हम लोग आयेंगे और उसी माध्यम से एक एसओपी निकालेंगे जिसके माध्यम से अच्छी तरह से हम लोग काम करेंगे।*

या आजाराची लागण झालेल्या रुग्णांची संख्या आता १०१ झाली आहे. त्यातले ८१ पुणे महापालिका क्षेत्रात, १४ पिंपरी चिंचवड भागात, तर ६ इतर जिल्ह्यांमधले आहेत. याप्रकरणी २५ हजारांहून अधिक घरांची पाहणी महापालिकेनं केली आहे.

---------------------------

शरद पवार

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती ठीक असून चार दिवस विश्रांतीचा सल्ला डॉक्टरांनी दिला असल्याची माहिती त्यांची कन्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी आज मुंबईत पत्रकारांशी बोलताना दिली. खासदार सुळे म्हणाल्या, त्यांना खोकल्याचा त्रास झाला आहे.

---------------------------

संविधान गौरव महोत्सव

भारतीय राज्यघटनेच्या ७५ व्या वर्षपूर्तीनिमित्त फेब्रुवारी महिन्यात राज्यातल्या ६ हजारांहून अधिक महाविद्यालयांत "संविधान गौरव महोत्सवा" अंतर्गत विविध

उपक्रमाचं आयोजित केले जाणार आहेत. उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही घोषणा केली. या महोत्सवात तज्ज्ञांची व्याख्यानं, निबंध, वक्तृत्व, भित्ती पत्रकस्पर्धा, चर्चासत्रांच्या आयोजनासोबतच जनजागृती अभियानही चालवलं जाणार आहे. राज्यघटनेतल्या मूलभूत मूल्यांचा पुनरुच्चार करणं आणि नागरिकांना त्यांचे घटनात्मक अधिकार आणि कर्तव्यांचं पालन करण्यासाठी प्रेरित करणं, हा या महोत्सवाचा उद्देश आहे.

----------------------------

विधी महाविद्यालय शतकपूर्ती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या शतकपूर्ती निमित्त उद्या अर्थात 28 जानेवारी रोजी सायंकाळी 6:45 वाजता अमरावती रोड स्थित लॉ कॉलेज परिसरात कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून,  याप्रसंगी या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती, विकास शिरपूरकर उपस्थित राहणार असल्याची माहिती या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रविशंकर मोर यांनी दिली. दरम्यान, शतकोत्सव पूर्तीनिमित्त व्याख्यानांचं आयोजन करण्यात आलं असून, सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्या किमान एक हजार न्यायालयीन याचिका प्रकरणे लढली जातील असं डॉ.मोर यांनी सांगितलं.  या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांमध्ये माझे पंतप्रधान  पी.व्ही.नरसिंहराव, उपराष्ट्रपती जस्टिस हिदायतुल्लाह त्याच प्रमाणे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अशा अनेक माजी प्रतिष्ठित विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

----------------------------

मराठी भाषा पंधरवडा

नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयात आज विविध स्पर्धांचे आयोजन करून मराठी भाषा पंधरवाडा साजरा झाला. या कार्यक्रमात विविध शासकीय कार्यालयांचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले. अप्पर आयुक्त सामान्य प्रशासन प्रदीप कुलकर्णी यांच्या हस्ते आणि प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी दिपाली मोतीयेळे यांनी मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा, मराठीतील विविध भाषा व्यवहार आणि मराठीच्या संवर्धनासाठी आवश्यक प्रयत्न याबाबत विचार मांडले.

----------------------------

वाचन संकल्प

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. व्हि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते ज्ञानस्त्रोत केंद्राच्या वतीने पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धेचे आयोजन नुकतंच करण्यात आले. वाचन संकल्प महाराष्ट्र या उपक्रम अंतर्गत या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धेत विद्यापीठाच्या ४० विभागातील २५२ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानस्त्रोत्र केंद्राचे संचालक डॉ. विजय खंडाळ यांनी भूषविले.

----------------------------

हवामान

विदर्भात आज नागपुरात **14** पूर्णांक **1** अंश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी किमान तापमानाची नोंद करण्यात आली त्यानंतर गडचिरोली येथे **14** पूर्णांक **8** अंश सेल्सिअस भंडारा आणि गोंदिया येथे **15** अंश सेल्सिअस तर वर्धा येथे पंधरा पूर्णांक दोन अंश सेल्सिअस इतक किमान तापमान नोंदवण्यात आलं, काही दिवस किमान तापमानात वाढ नोंदवल्यानंतर पुन्हा किमान तापमानात किंचित घट जाणवते आहे अकोला येथे **35** अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं.

----------------------------